स्थिति श्रीराज्याभिषेक शके ३५०

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

**जा.क्र.मनपा/पा.पु. व मलनि/1192/2024-25** **दि.06 /09/2024**

**प्रति**,
जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** जाहिरात महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे बाबत.

**मिरा-भाईंदर शहरातील इमारती / झोपडपट्टी व इतर ठिकाणी मागणी व आवश्यकता पडताळून टॅकरद्वारे शुध्द पाणी पुरवठा व व्यवसायिक वापरासाठी पुर्नप्रक्रिया केलेले पाणी महानगरपालिकेच्या पारित ठरावानुसार पाण्याच्या शुल्काचा भरणा महानगरपालिकेस केल्यानंतर इच्छीत स्थळी टॅकरने पाणी पुरवठा करण्यासाठी टॅकर पुरवठादारांचे पॅनल तयार करणे** या कामाकरीता सोबत जोडलेली जाहिरात महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच सदर जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतर या विभागास वृत्तपत्रांच्या प्रती पुरविण्यात याव्यात.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

प्रत :- सिस्टीम मॅनेजर
(वेबसाईट प्रसिध्दिकरीता)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // जाहिरात //

**मिरा-भाईंदर शहरातील इमारती / झोपडपट्टी व इतर ठिकाणी मागणी व आवश्यकता पडताळून टॅकरद्वारे शुध्द पाणी पुरवठा व व्यवसायिक वापरासाठी पुर्नप्रक्रिया केलेले पाणी महानगरपालिकेच्या पारित ठरावानुसार पाण्याच्या शुल्काचा भरणा महानगरपालिकेस केल्यानंतर इच्छीत स्थळी टॅकरने पाणी पुरवठा करण्यासाठी टॅंकर पुरवठादारांचे पॅनल तयार करणे** याकामी इच्छीक असलेल्या टॅंकर पुरवठादाराकडून या जाहिरतीद्वारे विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

सदर कामी खाजगी टॅंकरच्या वाहतुकीचा दर प्रति कि.मी. रु.30/- इतका राहील. तसेच टॅंकरधारकांना परवान्यासाठी प्रति टॅंकर रु.5000/- परवाना शुल्क (प्रति वर्षी) व सुरक्षा अनामत रु.1,00,000/- भरणे बंधनकारक राहिल.

तरी इच्छुक अर्जदारांनी **दि.11/09/2024 ते दि.25/09/2024** रोजी 12.00 वाजेपर्यत मिरा-भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग, पहिला मजला, भाईंदर (प.) या विभागात खालील नमुद कागदपत्रे, फॉर्म सोबत जोडलेल्या अटीशर्तीनुसार पात्र अर्जदारांनी पिण्याच्या पाण्यासाठी तसेच व्यवसायीक वापरासाठीच्या टॅंकर परवान्यासाठी स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक राहील.

इच्छूक अर्जदारांचे विहीत नमुन्यातील अर्ज लिफाफयामध्ये **दि.26/09/2024** रोजी दुपारी 13.00 वाजेपर्यंत पाणी पुरवठा विभागात स्विकारण्यात येतील व कागदपत्राची छाननी करुन व प्रत्यक्ष टॅंकरची पाहणी करुन पात्र अर्जदारांना परवाना देण्यात येईल. तसेच सदर परवाना त्या दिनांकापासून एका वर्षाकरीता ग्राहय राहील.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर सदर जाहिरात उपलब्ध आहे. इच्छुक अर्जदारांनी टॅंकर परवानगीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज व अटीशर्तीसह पाणी पुरवठा विभागात फॉर्म फि रु.500/- अदा करुन उपलब्ध करुन घ्यावा.

सदर कामी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांचा तपशील खालीलप्रमाणे आहे तसेच सदर कामी पात्र होणेकरीता फॉर्म सोबत जोडलेल्या अटीशर्तीनुसार रु. 500/- स्टॅम पेपरवर हमीपत्र सादर करणे तसेच खालील कागदपत्रांची स्वतंत्र पुर्तता करणे आवश्यक राहील.

1. Form Fee Receipt
2. RTO Registration Copy of all tankers
3. PUC & Insurance Certificate
4. Income Tax Return
5. GST Ragistration Copy

परवानाधारकांस टॅंकर पुरवठा करणे बंधनकारक राहील.

**शहर अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**ठिकाण :- भाईंदर**
**दिनांक :- 05/09/2024**